RESERVE BANK OF INDIA

**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

एप्रिल २४, २००४

**अनिवासी भारतीयांकडून नव्या ठेवी स्वीकारण्यास विशिष्ट व्यक्ती / संस्थांना भारतीय रिझर्व्ह बँकेची मनाई**

भारतीय रिझर्व्ह बँकेने आज अधिकृत बँका सोडून इतर व्यक्ती/ संस्थांना अनिवासी भारतीयांकडून परदेशांमधून भरण्याच्या (रेमिटन्स) स्वरुपात येणाऱ्या ठेवी स्वीकारण्यास मनाई केली आहे. त्यांना त्यांच्या नॉन-रेसिडेंट एक्स्टर्नल (एनआरई) / फॉरेन करन्सी नॉन-रेसिडेंट (बँक) (एफसीएनआर (बी)) खात्यांवर टाकलेल्या रकमांच्या स्वरुपातही अनिवासी भारतीयांकडून ठेवी स्वीकारण्यास परवानगी दिली जाणार नाही. मात्र, त्यांना त्यांच्या हिशेब पुस्तकांमध्ये अशा सध्या असलेल्या ठेवी सुरु ठेवण्यास व प्रत्यावर्तन अगर अप्रत्यावर्तनावर आधारित अनिवासी भारतीयांच्या नावे असलेल्या ठेवींचे नूतनीकरण करण्यास परवानगी दिली जाईल. अशा ठेवींवर मिळालेले व्याज पूर्वीप्रमाणे प्रत्यावर्तनीयच राहील. या सुधारित सूचना ताबडतोब अमलात येतील. अधिकृत व्यापारी / अधिकृत बँका सोडून इतर व्यक्ती / संस्थांना अनिवासी भारतीयांकडून ठेवी स्वीकारण्यास मनाई करण्याऱ्या हा निर्णय, या प्रश्नावर नुकत्याच झालेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर फेरविचार करुन घेण्यात आला आहे.

प्रचलित नियमांनुसार, अधिकृत व्यापारी / अधिकृत बँका वगळता, १९५६ च्या कंपनी कायद्या अंतर्गत नोंदणीकृत कंपनी (रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत नॉन बँकिंग फायनान्स कंपनी धरुन) किंवा लोकसभेच्या कायद्या अंतर्गत अगर राज्य विधानसभेच्या कायद्या अंतर्गत निर्मित कॉर्पोरेट बॉडी यांना, अनिवासी भारतीयांकडून प्रत्यावर्त्तनाधारित ठेवी स्वीकारण्याची परवानगी आहे, तर भारतातील कंपनी अगर व्यक्तिस्वामीत्व असलेली अगर भागीदारी संस्था, यांना अनिवासी भारतीयांकडून अप्रत्यावर्तनाधारित ठेवी स्वीकारण्याची परवानगी आहे. अशा ठेवींवर मिळालेले व्याज हे चालू उत्पन्न असल्यामुळे ते भारताबाहेर प्रत्यावर्तनास पात्र आहे.

अधिकृत व्यापाऱ्यांना या सुधारित सूचना त्यांच्या संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देण्यास सांगण्यात आले आहे.

**पी.व्ही. सदानंदन**
व्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४ / १२६४**